सकाळ

# बृहन्महाराष्ट्र मंडळाचे अधिवेशन जुलै २००९ मध्ये

पुणे, ता. १२ - सांस्कृतिक कार्यक्रमांनी गाजणारे अमेरिकेतील बृहन्महाराष्ट्र मंडळाचे चौदावे अधिवेशन दोन ते पाच जुलै २००९ या काळात फिलाडेल्फिया येथे होणार आहे. सांस्कृतिक कार्यक्रमांच्या जोडीने ट्रेड फेअर, बिझनेस कॉन्फरन्स, वैद्यकीय व्यावसायिकांचा मेळावा, युवक आणि बच्चेकंपनीसाठी विशेष कार्यक्रम, बिझनेस फोरम; तसेच 'थीम बेस्ड फूड' ही या अधिवेशनाची काही ठळक वैशिष्ट्ये असतील. ....
अधिवेशनाचे संयोजक मुकुंद कुटे, सहसंयोजक मंदार जोगळेकर, ट्रेड फेअर व एक्स्पो समितीचे प्रमुख किशोर गोरे यांनी आज पत्रकारांना ही माहिती दिली.

ते पुढे म्हणाले, "अमेरिकेत सध्या तब्बल दोन लाख मराठी मंडळी आहेत. या साऱ्यांना परस्परांशी जोडण्याचे काम अधिवेशनाच्या निमित्ताने होते. 'बीएमएम' सध्या अमेरिकेतील ४० हून अधिक मराठी मंडळांचे प्रतिनिधित्व करते. प्रत्येकाचा व्यस्त दिनक्रम, लांब अंतरे आणि मनुष्यबळाची मर्यादा यामुळे अधिवेशनाच्या तयारीला आधीपासूनच सुरवात करावी लागते. आगामी अधिवेशनासाठी अमेरिकेतील सुमारे पाच हजार मराठी मंडळी येतील; तसेच महाराष्ट्रातून व अन्य देशांतून सुमारे एक हजार मराठी मंडळी येतील, अशी अपेक्षा आहे. यासाठी फिलाडेल्फियामध्ये एक लाख स्क्वेअर फुटांचे कन्व्हेन्शन सेंटर उभारण्यात आले आहे. बिझनेस कॉन्फरन्ससाठी सुमारे सहाशे उद्योजकांची उपस्थिती असेल. वैद्यकीय मेळाव्यासाठीही सुमारे सहाशे व्यावसायिक यावेत, अशी अपेक्षा आहे. महाराष्ट्र, गोवा आणि पेनसिल्व्हानिया यांचे एकत्रित ट्रेड फेअर सुमारे चारशे दालनांचे असेल. संमेलनातील पन्नास टक्के कामे पूर्णत्वाच्या मार्गावर आहेत. इथल्या मंडळींना अधिवेशनाची अद्ययावत माहिती मिळावी, या हेतूने पुणे आणि मुंबई येथे विशेष केंद्रे सुरू करण्यात आली आहेत. अधिवेशनासाठीची नोंदणी मात्र एक जानेवारी २००९ पासून सुरू होईल. अधिवेशनातील अन्य कार्यक्रम ठरवण्यासाठी इच्छुकांनी फेब्रुवारी २००८ पर्यंत मंडळाच्या वेबसाइटवर आपल्या कार्यक्रमांची सविस्तर माहिती, छायाचित्रे, ऑडिओ तसेच व्हिडिओ लिंक देणे अपेक्षित आहे."

या अधिवेशनासाठी येऊ इच्छिणाऱ्या मंडळींसाठी 'ट्रॅव्हल पॅकेजेस' उपलब्ध करून देण्यासाठी मंडळ प्रयत्नशील आहे. तसेच व्हिसा मिळवण्यासाठीही मंडळातर्फे प्रयत्न केले जाणार आहेत. देशाप्रमाणेच युरोप, ऑस्ट्रेलिया, दुबई, अबुधाबी आदी देशांतील मराठी मंडळींनाही या अधिवेशनाला उपस्थित राहता यावे, म्हणून मंडळ प्रयत्न करणार आहे. अधिवेशनासाठी पाच हजार लोकांना सामावून घेणारे विशाल वातानुकूलित सभागृह, दोन हजार क्षमतेचे ड्रामा थिएटर, आठशे ते एक हजार क्षमतेचे सभागृह उभारण्यात येणार आहे. या अधिवेशनात मराठी चित्रपटांचे प्रिमिअर करण्याचाही विचार आहे. या सर्व उपक्रमांसाठी मराठी मंडळींनी www.bmm२००९Philadelphia.org तसेच www.bmmonline.org या वेबसाइटवर माहिती पाहावी.